क्रमांक : का.स./बैठक/२१७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : १८ ऑगस्ट, २००६.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २००६ (मंगळवार) रोजी झालेल्या २१७ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१८.८.२००६

सचिव,
कार्यकारी समिती

प्रति :

मुख्य सचिव, - अध्यक्ष
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

श्री.द.म.सुकथनकर, - सदस्य
"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,
मुंबई - ४०० ०१८.

श्री.र.य.तांबे, - सदस्य
ए-६००, शिवम अपार्टमेंट्स,
सुरेंद्रनगर, आरपीटीएस रोड,
नागपूर - ४४० ०१५.

श्री. हरिशंकरन्, - सदस्य
कार्यकारी संचालक - इन्फ्रास्ट्रक्चर,
इन्फ्रास्ट्रक्चर लिजिंग अँड फिनान्सिअल सर्व्हिसेस लिमिटेड,
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

प्रधान सचिव (१), - सदस्य
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

...२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

निमंत्रित :

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रत अग्रेषित :-

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २१७ व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २५ जुलै, २००६ (मंगळवार) |
| वेळ | : | सायंकाळी ५.०० वाजता |
| सभास्थान | : | मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,<br>५ वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| डॉ.डी.के.शंकरन<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| डॉ.टी.चंद्र शेखर<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ.ज.मो.फाटक
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.ए.एम.शिंदेकर,
सचिव (विधि विधान),
विधि व न्याय विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.संजय उबाळे
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प),
बृहन्मुंबई महानगरपालिका
(महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.मिलिंद म्हैसकर
सह-महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्याम वर्धने
सह-सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन
(प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी म्हणून)

श्री.के.एन.पटेल
विधि सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.अ.वि.देशिंगकर
अति.महानगर आयुक्त (अभियांत्रिकी),
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.सुरेश परदेशी
मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.यु.व्ही.लुकतुके
प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

कु.उमा अड्सुमली
प्रमुख, नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

श्री.डी.डी.भिडे
मुख्य अभियंता,
मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण

श्री.प्र.ह.राऊत
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.बा.नागे
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या २१६ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या २१६ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालासंबंधात खालीलप्रमाणे चर्चा झाली :–

**बाब क्र.३ : मुंबई मेट्रो रेल प्रकल्प - वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर : सार्वजनिक - खाजगी सहभागाने (PPP) - MMRDA + Mumbai Metro-1 Consortium lead by Reliance Energy मार्फत प्रकल्प उभारणे.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या प्रकल्पासाठी स्टॅन्डर्डगेजचा वापर करण्यास तसेच प्रकल्पाच्या किंमतीस आणि व्यवहार्यता तफावतीच्या रु.६५० कोटीच्या रक्कमेस महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिली असून व्यवहार्यता तफावतीची रक्कम मिळविण्याकरीता केंद्र शासनाकडे दिनांक १६ जून, २००६ रोजी प्रस्ताव पाठविला आहे. त्यानंतर, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या आर्थिक व्यवहार विभागाने या प्रस्तावासंबंधात मागविलेली अतिरिक्त माहिती पाठविण्यात आली असून त्या विभागामार्फत प्रस्तावावर पुढील कार्यवाही सुरु आहे.

अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या छन्नमार्गावर प्रवाश्यांच्या विकिरण (dispersal) संबंधी कोणतीही अडचण उद्‌भवणार नाही तसेच पश्चिम रेल्वेने या छन्नमार्गाच्या संरेखनास यापूर्वीच मान्यता दिलेली आहे.

**बाब क्र.९ : आयकर विभागाने सन २००२-०३ या आर्थिक वर्षामध्ये प्राधिकरणाच्या उत्पन्नावर रु.२२५.२७ कोटी इतका आयकर भरण्याकरीता केलेली मागणी.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, आयकर आयुक्त यांच्याकडे प्राधिकरणाने केलेल्या अपिलाची पुढील सुनावणी आता दिनांक २२ ऑगस्ट, २००६

रोजी होणार आहे. तसेच आयकर भरण्यासाठी आयकर विभागाने पाठविलेल्या नोटीसला स्थगिती मिळविण्यासाठी प्राधिकरणाने आयकर विभागाकडे अर्ज केला होता. त्यास आयकर विभागाने रु.१ कोटी इतकी लाक्षणिक रक्कम भरण्यासापेक्ष दिनांक ३१ जुलै, २००६ पर्यंत स्थगिती दिली आहे. त्यानुसार आयकराची रक्कम भरण्यास मान्यता द्यावी अशी विनंती कार्यकारी समितीस करण्यात आली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरण हे राज्य शासनाची एजन्सी आहे अशी अधिसूचना प्रसृत करण्यासाठी तसेच प्राधिकरणाच्या अधिनियमात आवश्यक ती सुधारणा करण्यासाठी प्राधिकरणाने राज्य शासनास प्रस्ताव सादर केला आहे. यासंबंधात श्री.शिंदेकर, सचिव, विधि व न्याय विभाग यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या अधिनियमामध्ये सुधारणा करुनही प्राधिकरणास आयकरातून सूट मिळणार नाही. तथापि, यासंबंधात महाराष्ट्र शासनाचे महा अधिवक्ता (Advocate General) यांचा सल्ला घेणे संयुक्तिक होईल.

यासंबंधात अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, प्राधिकरणाच्या अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासंबंधात महा अधिवक्ता यांचा सल्ला घेऊन नगर विकास विभाग आणि विधि व न्याय विभाग यांनी प्राधिकरणाच्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी अधिसूचना प्रसृत करण्याचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे ठेवण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

त्यानंतर, आयकर विभागाने मागणी केलेली रु.१ कोटी इतकी लाक्षणिक रक्कम, प्राधिकरणाने आयकर आयुक्त यांच्याकडे केलेल्या अपिलास बाधा येणार नाही या सापेक्ष (without prejudice), भरण्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.३</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील सायन हॉस्पिटल या चौकातील उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

३.१ सुरुवातीस, कार्यसूचीतील बाब क्र.३ ते ८ नुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील प्रस्तावित ६ उड्डाणपूलांसंबंधी सादरीकरणाद्वारे प्रस्तावित उड्डाणपूलांचे स्थान, जनरल ॲरेन्जमेंट ड्रॉईंग, क्रॉस सेक्शन, उड्डाणपूलांचा अंदाजित खर्च इत्यादीसंबंधी माहिती देण्यात आली.

३.२ सदर प्रस्तावित उड्डाणपूलांसंबंधी माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पूर्व द्रुतगती महामार्गावरील नवघर (मुलुंड) व सुमन नगर येथील उड्डाणपूलांचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पूर्व द्रुतगती महार्गावरील वाहतूक सायन पर्यंत वेगाने येऊ शकेल. त्यामुळे सायनपासून दक्षिण मुंबईकडे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गाने जाणारी वाहतूक पुढे त्याच वेगाने जाण्यासाठी सायन हॉस्पिटल, किंग्ज सर्कल, हिंदमाता, भारतमाता, दत्ताराम लाड पथ तसेच सायन चौक येथे उड्डाणपूल बांधणे आवश्यक आहे. हे उड्डाणपूल मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या प्राधान्यक्रम-१ अंतर्गत हाती घ्यावयाचे असून त्यांच्या अंमलबजावणीचे काम प्राधिकरणाच्या निधीतून तसेच प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. या उड्डाणपूलांची संकल्पचित्रे इत्यादी बनविण्यासाठी प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नियुक्ती केली असून त्यांनी उड्डाणपूलांचे प्राथमिक संकल्पन, अंदाजित खर्च इत्यादी तपशील तयार केला आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाचा कालावधी कमी करण्यासाठी तसेच बांधकाम कालावधीत वाहतूकीस कमीत कमी अडथळा व्हावा यादृष्टीने या सर्व उड्डाणपूलांसाठी प्रिकास्ट सेगमेन्टल बांधकाम पध्दतीचा वापर करावयाचा असून या पध्दतीमध्ये जागेवरील काम व सेगमेन्ट प्रिकास्टींगचे काम एकाचवेळी सुरु करता येते. तसेच जागेवरील सेगमेन्ट जोडणीचे काम कमी वर्दळीच्या रात्रीच्या वेळी केल्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होत नाही.

३.३ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे निदर्शनास आणले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग हा दक्षिणोत्तर मार्ग स्वातंत्र्यापूर्वी बांधण्यात आला असून दक्षिण मुंबईकडे जाणा-या मुख्य जलवाहिन्या, मलनिःसारण वाहिन्या याच रस्त्याखालून टाकण्यात आलेल्या आहेत. प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामासाठी सध्याच्या उपयोगिता वाहिन्या (Utilities) अन्यत्र हलवाव्या लागतील. बाब टिप्पणीमध्ये सर्व प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाचा कालावधी १२ महिने नमूद केला आहे, तथापि ब-याचवेळी नागरी उड्डाणपूलांची बांधकामे करताना भूमिगत उपयोगिता वाहिन्या अन्यत्र हलविण्यास होणा-या विलंबामुळे अशी बांधकामे पूर्ण करण्यासाठी साधारणपणे अडीच वर्षांचा कालावधी लागतो व त्यामुळे निविदेतील तरतूदीनुसार भाववाढीतील फरकाची रक्कम कंत्राटदाराला अदा करावी लागते. श्री.सुकथनकर यांनी पुढे असेही सांगितले की, प्रस्तावित उड्डाणपूलांच्या स्थानालगत असलेली मुंबई महानगरपालिकेची खुली मैदाने व मोकळे

भूखंड यापैकी काही जागा प्रिकास्टींग यार्ड आदीसाठी वापरण्याची शक्यता पडताळून पहावी कारण प्रिकास्टींग यार्डाचे ठिकाण बांधकामाच्याजवळ असल्यास वाहतूक खर्चात म्हणजे पर्यायाने बांधकामाच्या खर्चात बचत होऊ शकेल व वाहतूकीस अडथळाही कमी होईल.

यासंबंधात महानगर आयुक्त यांनी असे स्पष्ट केले की, प्रस्तावित उड्डाणपूलांच्या खांबांचे काम सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांच्या दुभाजकाच्या परिसरात करावयाचे आहे. सर्व संबंधित संस्थांच्या सल्ल्याने प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाच्या परिसरातील जलवाहिन्या आणि अन्य उपयोगिता वाहिन्यांचे स्थळदर्शक नकाशे यापूर्वीच तयार करण्यात आले आहेत. आवश्यकतेनुसार उपयोगिता वाहिन्या हलविण्याची जबाबदारी संबंधित संस्था म्हणजे बृहन्मुंबई महानगरपालिका, बेस्ट इत्यादी संस्थांची असून आवश्यकतेनुसार प्राधिकरण या संस्थांना मदत करील. तसेच बांधकामात येणा-या मोठया आकाराच्या ट्रंक वाहिन्या अन्यत्र हलविण्याऐवजी उड्डाणपूलाच्या संकल्पनामध्ये सुयोग्य बदल करण्याची पध्दती प्रचलित असून प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बाबतीतही या पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, उपयोगिता वाहिन्या अन्यत्र हलविल्यानंतर उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी आवश्यक असलेली जागा ठेकेदारास हस्तांतरीत केल्याच्या दिनांकापासून उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या कालावधीची परिगणना करण्यात येईल. तसेच ठेकेदारांना कमीतकमी कालावधीत बांधकाम पूर्ण करण्यास प्रवृत्त करण्यात येईल. मात्र असमर्थनीय विलंबनाबाबत नुकसानभरपाई वसूल करण्याची तरतूदही करण्यात येईल. त्याचप्रमाणे प्रस्तावित उड्डाणपूलाची लांबी इत्यादींचा विचार करुन उड्डाणपूलाच्या प्रस्तावित बांधकामाच्या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्रिकास्टींग यार्डासाठी उड्डाणपूलाजवळची जागा मिळविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांसमवेत चर्चा करण्यात येईल.

**३.४** श्री.मनु कुमार श्रीवास्तव, अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी अशी सूचना केली की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर तुकडया-तुकडयामध्ये अनेक उड्डाणपूल बांधण्याऐवजी प्रस्तावित लांबीत उन्नत रस्त्याची निर्मिती करावी जेणेकरुन या रस्त्याच्या वाहतूक क्षमतेत मोठया प्रमाणात वाढ होईल. त्यांनी असेही निदर्शनास आणले की, उड्डाणपूल बांधल्यानंतर या मार्गावर मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेता येणार नाही.

यासंबंधात असे स्पष्ट करण्यात आले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर अनेक चौक असून या प्रत्येक चौकात वळणारी वाहतूक तसेच बाजूच्या रस्त्यावरुन येऊन चौकात वळून या मार्गावर येणाऱ्या वाहतूकीसाठी प्रत्येक चौकात चढण्यासाठी व उतरण्यासाठी जोडरस्ते (Ramps) द्यावे लागतील. तसेच उन्नत रस्त्यावरील मार्गिका, जोडरस्त्यावरील मार्गिका व अस्तित्वातील रस्त्यावरील पूरेशा रुंदीच्या मार्गिका निर्माण करण्यासाठी सध्याच्या रस्त्यांची रुंदी खूपच अपूरी आहे. त्यामुळे उन्नत रस्त्यांची निर्मिती शक्य होणार नाही. प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुं.म.प्र.वि. प्राधिकरण यांनीही स्पष्ट केले की, मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या बृहत योजनेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर मेट्रो रेल्वेची तरतूद करण्यात आलेली नाही.

३.५ प्राधिकरणाच्या विधी सल्लागारांनी असे निदर्शनास आणले की, प्रस्तावित उड्डाणपूलांची कामे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील रस्त्यावर करावयाची असल्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ मधील तरतूदीनुसार सदरील कामे हाती घेण्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांची सहमती प्राप्त करावी लागेल. यासंबंधात अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निदेश दिले की, प्राधिकरणाने याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे विनाविलंब द्यावा व बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्राथम्याने सहमती प्रदान करावी.

३.६ वरील चर्चेनंतर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावर प्रस्तावित केलेल्या प्रत्येक उड्डाणपूलाच्या प्रस्तावासंबंधात चर्चा करण्यात आली.

३.७ सायन हॉस्पिटल या चौकातील उड्डाणपूलासंबंधी महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, हा उड्डाणपूल सुमारे ५९० मीटर लांबीचा, १७.३० मीटर रुंदीचा व २ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे.गिलकॉन प्रोजेक्ट सर्व्हिसेस लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी संकल्पने तयार करणे, त्याची अन्य सल्लागारांकडून प्रूफ तपासणी करुन घेणे, सविस्तर अंदाजपत्रके व निविदा संच तयार करणे इत्यादी कामे हाती घेतली आहेत. या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने व ढोबळ प्रस्ताव तयार केले असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावित उड्डाणपूलाचे बांधकाम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

..८/-

सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.२०.७० कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आलेला आहे.

३.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.९९६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन हॉस्पिटल या चौकातील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.२०.७० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील हिंदमाता सिनेमा या चौकातील उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

४.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, हिंदमाता सिनेमा या चौकातील हा प्रस्तावित उड्डाणपूल सुमारे ४६२ मीटर लांबीचा, १७.३० मीटर रुंदीचा व २ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे.गिलकॉन प्रोजेक्ट सर्व्हिसेस लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी संकल्पने तयार करणे, त्याची अन्य सल्लागारांकडून प्रूफ तपासणी करुन घेणे, सविस्तर अंदाजपत्रके व निविदा संच तयार करणे इत्यादी कामे हाती घेतली आहेत. या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने व ढोबळ प्रस्ताव तयार केला असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावित उड्डाणपूलाचे बांधकाम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या

बांधकामाचा अंदाजित खर्च रु.१४.८९ कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

४.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.११७</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील हिंदमाता सिनेमा या चौकातील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.१४.८९ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.५</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील भारतमाता सिनेमा या चौकातील उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, भारतमाता सिनेमा या चौकातील हा प्रस्तावित उड्डाणपूल सुमारे ४३६ मीटर लांबीचा, १७.३० मीटर रुंदीचा व २ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे.गिलकॉन प्रोजेक्ट सर्व्हिसेस लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी संकल्पने तयार करणे, त्याची अन्य सल्लागारांकडून प्रूफ तपासणी करुन घेणे, सविस्तर अंदाजपत्रके व निविदा संच तयार करणे इत्यादी कामे हाती घेतली आहेत. या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने व ढोबळ प्रस्ताव तयार केला असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावित उड्डाणपूलाचे बांधकाम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.१५.८३ कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

**५.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.९९८ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील भारतमाता सिनेमा या चौकातील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.१५.८३ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील दत्ताराम लाड पथ आणि लालबाग या चौकातील एकत्रित उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**६.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दत्ताराम लाड पथ आणि लालबाग या चौकातील हा एकत्रित उड्डाणपूल सुमारे १६४६ मीटर लांबीचा, ९ मीटर रुंदीचा व २ पदरी एकेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे. इन्टरकॉन्टीनेंटल कन्सल्टंट ॲन्ड टेक्नोक्रॅट प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी संकल्पने तयार करणे, त्याची अन्य सल्लागारांकडून प्रूफ तपासणी करुन घेणे, सविस्तर अंदाजपत्रके व निविदा संच तयार करणे इत्यादी कामे हाती घेतली आहेत. या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने व ढोबळ प्रस्ताव तयार केला असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावित उड्डाणपूलाचे बांधकाम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.४०.४९ कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

..११/-

६.२ या प्रस्तावासंबंधात अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता, प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी स्पष्ट केले की, या परिसरातील सर्व चौक टी पध्दतीचे असुन वाहतूक फक्त पूर्व बाजूने येत असल्यामुळे डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील दक्षिणेस जाणा-या वाहतूकीसाठी दुहेरी उड्डाणपूलाऐवजी एकेरी उड्डाणपूल प्रस्तावित करण्यात आला आहे.

६.३ चर्चेदरम्यान, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सध्या भायखळा येथे ग्लोरीया चर्चसमोर एकेरी वाहतूकीसाठी उपलब्ध असणारा उड्डाणपूल तशाचप्रकारचे बांधकाम करुन दुहेरी वाहतूकीसाठी वापरण्याच्या शक्यतेची पडताळणी करण्यात यावी.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.९९९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील दत्ताराम लाड पथ आणि लालबाग या चौकातील एकत्रित उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.४०.४९ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.७</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील किंग्ज सर्कल (महेश्वरी उद्यान) या चौकातील उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.</u>**

७.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, किंग्ज सर्कल (महेश्वरी उद्यान) या चौकातील हा प्रस्तावित उड्डाणपूल सुमारे ९२८ मीटर लांबीचा (अशोक तुळपुळे चौकातील संबंधित उड्डाणपूलाची लांबी सुमारे ३३० मीटर), १७.३० मीटर रुंदीचा व

२ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे. एस.एन.भोबे ॲन्ड असोसिएट्स प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी संकल्पने तयार करणे, त्याची अन्य सल्लागारांकडून प्रूफ तपासणी करुन घेणे, सविस्तर अंदाजपत्रके व निविदा संच तयार करणे इत्यादी कामे हाती घेतली आहेत. या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने व ढोबळ प्रस्ताव तयार केला असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. प्रस्तावित उड्डाणपूलाचे बांधकाम १२ महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.४६.२६ कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

**७.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१००० :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील किंग्ज सर्कल (महेश्वरी उद्यान) येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.४६.२६ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) अंतर्गत हाती घ्यावयाच्या डॉ.आंबेडकर मार्गावरील सायन चौकातील दुहेरी उड्डाणपूलाच्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**८.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन येथे सध्या उत्तर दिशेकडे जाणाऱ्या वाहनांसाठी उपलब्ध असलेल्या उड्डाणपूलाप्रमाणे दक्षिणेकडे जाणाऱ्या वाहनांसाठी बांधावयाचा हा प्रस्तावित

..१३/-

उड्डाणपूल सुमारे ११६२ मीटर लांबीचा, १२ मीटर रुंदीचा व ३ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या कामासाठी मे.गिलकॉन प्रोजेक्ट सर्व्हिसेस लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून या सल्लागारांनी उड्डाणपूलाची रेखांकने, संकल्पने व सविस्तर प्रस्ताव तयार केला असून त्यास महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नेमलेल्या समितीने सहमती दर्शविली आहे. सल्लागारांनी तयार केलेल्या सविस्तर अंदाजपत्रकाप्रमाणे या उड्डाणपूलाच्या बांधकामाचा अंदाजित खर्च रु.४५.२४ कोटी इतका आहे. या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात आला आहे.

८.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१००१</u> :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत प्राधान्यक्रम-१ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील सायन चौकातील उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या रु.४५.२४ कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प (MUIP) :</u>**
**<u>मुख्य जोडरस्त्यावर पश्चिम रेल्वेच्या दहिसर व मीरा रोड रेल्वे स्थानकादरम्यान बांधावयाच्या उड्डाणपुलाच्या लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.</u>**

९.१ या प्रस्तावाची पार्श्वभूमी विशद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, पश्चिम उपनगरामध्ये दक्षिणोत्तर जाणारा मुख्य जोडरस्ता वांद्रे येथे सुरु होऊन दहिसर येथे पश्चिम द्रुतगती महामार्गास मिळतो. या रस्त्याची एकूण लांबी सुमारे २४ कि.मी. असून या रस्त्याची सुधारणा / बांधकाम प्रगतीपथावर आहे. प्राधिकरणाने काम हाती घेण्यापूर्वी हा मुख्य जोडरस्ता तुकडया-तुकडयाने अस्तित्वात होता. त्यामुळे या दक्षिणोत्तर महत्वाच्या रस्त्याचा पुरेसा

वापर होत नव्हता. आता सुधारणांच्या कामाबरोबरच या रस्त्याच्या अस्तित्वात नसलेल्या बहुतेक सर्व लांबीतील कामे, अतिक्रमणे हटवून / भू-संपादनाची कार्यवाही पूर्ण करुन, यापूर्वीच हाती घेतली आहेत व पूर्णत्वाच्या टप्प्यावर आहेत. विमान पत्तन प्राधिकरणाच्या मालकीच्या जुहू येथील भागात सदरील रस्त्याचे बांधकाम होऊ शकलेले नाही. त्यांच्या धावपट्टीखालून बोगद्यातून हा रस्ता सांताक्रुजकडे नेण्याच्या प्रस्तावासही त्यांच्याकडून पुरेसा प्रतिसाद मिळालेला नाही. दहिसर (पूर्व) आणि दहिसर (पश्चिम) या भागातील या रस्त्याच्या आखणीमधून पश्चिम रेल्वेमार्ग जातो. मुख्य जोडरस्त्याच्या या भागात रेल्वेवरील उड्डाणपूलाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर अंधेरी परिसरातून दक्षिणोत्तर होणारी सर्व वाहतूक मुख्य जोडरस्त्यावरुन होईल व त्यामुळे सध्याच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील व स्वामी विवेकानंद मार्गावरील वाहतूकीचा ताण बराच कमी होईल. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी रेल्वेच्या पूर्व मान्यतेने या रेल्वे उड्डाणपूलाचे संकल्पन, नकाशे व अंदाजपत्रके तयार केल्यानंतर रेल्वे उड्डाणपूलाच्या रु.३३.९५ कोटी इतक्या अंदाजित खर्चाच्या कामासाठी ऑगस्ट, २००५ मध्ये वृत्तपत्रांत प्रसिध्दी देऊन सार्वजनिकरित्या निविदा मागविण्यात आल्या. तथापि, केवळ एकच निविदा प्राप्त झाली व सदर निविदा अंदाजित खर्चाच्या २५.५०% जास्त दराची होती. त्यामुळे सदर कामाच्या अंदाजपत्रकाचे पुनर्विलोकन करुन फेरनिविदा मागविण्याचे ठरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने उड्डाणपूलांच्या कामांसाठी वापरलेल्या दरांनुसार सदर उड्डाणपूलाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर कामाची सुधारीत अंदाजित किंमत आता रु.३४.८० कोटी इतकी आहे. त्यानुसार फेरनिविदा मागविण्यात आल्या. एकूण ८ निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ३ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी यांची अंदाजित खर्चापेक्षा १२.४८% जास्त दराची निविदा लघुत्तम होती. वाटाघाटीनंतर लघुत्तम निविदाकार मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी यांनी मूळ देकार कमी करुन दिलेला सुधारीत देकार अंदाजित खर्चाच्या १२.३३% जास्त दराचा आहे. सदरील लघुत्तम देकार रास्त व निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा असल्यामुळे कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

९.२ श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी असे स्पष्ट केले की, लघुत्तम निविदाकार मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी यांना पश्चिम द्रुतगती महामार्गावरील दिंडोशी येथील उड्डाणपूलाचे काम

..१५/-

तसेच ना.सी.फडके मार्गावरील बर्फीवाला चौकातील उड्डाणपूलाचे काम अशी २ कामे प्राधिकरणाने दिलेली असून दिंडोशी येथील उड्डाणपूलाच्या बांधकामाची प्रगती समाधानकारक आहे तसेच बर्फीवाला चौकातील उड्डाणपूलाचा कार्यारंभ आदेश नुकताच देण्यात आला आहे. अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी असेही सादर केले की, कंत्राटदारांना दिलेल्या कामाची प्रगती समाधानकारक आहे किंवा कसे याबाबत यापुढे संबंधित बाब टिप्पणीत स्पष्ट उल्लेख करण्यात येईल.

९.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१००२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुख्य जोडरस्त्यावर पश्चिम रेल्वेच्या दहिसर व मीरा रोड रेल्वे स्थानकादरम्यान उड्डाणपूलाच्या कामासाठी मे.जे.कुमार ॲन्ड कंपनी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु.१२.३३% जास्त दराची म्हणजे रु.३९,०१,३८,९७०/- (रुपये एकोणचाळीस कोटी एक लाख अडतीस हजार नऊशे सत्तर मात्र) किंमतीची (रेल्वेला द्यावयाच्या पर्यवेक्षण तसेच डी ॲन्ड जी चार्जेस व अग्रीम देखभाल खर्च वगळून) लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वेगवेगळ्या रिकाम्या जमिनींचे व मिळकतींचे संरक्षणासाठी बंदुकधारी सुरक्षारक्षक ठेकेदारांची तीन वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करणेबाबत.**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कार्यकारी

समितीच्या मान्यतेने डिसेंबर, २००२ पासून प्राधिकरणाच्या वेगवेगळया जमिनींचे व मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी ५ बंदूकधारी सुरक्षारक्षक ठेकेदारांना दरमहा प्रति बंदूकधारी सुरक्षारक्षक रु.४२००/- या दराने नियुक्त करण्यात आले आहे. सध्या या ठेकेदारांनी प्राधिकरणाच्या जमिनींचे व मिळकतींचे संरक्षण करण्यासाठी नियुक्त केलेल्या बंदूकधारी सुरक्षारक्षकांची एकूण संख्या १२१५ इतकी आहे. सुरक्षारक्षक ठेकेदारांची मुदत दिनांक २७ डिसेंबर, २००५ पर्यंत असल्याने नवीन ठेकेदाराच्या नियुक्तीसाठी सप्टेंबर, २००५ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, काही कार्यालयीन अडचणींमुळे या निविदा रद्द करण्यात आल्या. त्यानंतर फेब्रुवारी, २००६ मध्ये वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन नव्याने निविदा मागविण्यात आल्या. विहित कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या एकूण ९ निविदांपैकी निविदेत नमूद केलेल्या अटींनुसार ५ निविदा पात्र ठरल्या. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, या ५ पात्र निविदाकारांपैकी ४ निविदाकारांनी दरमहा प्रति बंदूकधारी सुरक्षारक्षक रु.४२००/- असा दर नमूद केला असून ५व्या निविदाकाराने रु.४५६१.१७ इतका दर नमूद केला आहे. या सर्व ठेकेदारांशी वाटाघाटी केल्या असता त्या सर्वांनी रु.४२००/- या दराने काम करण्याची तयारी दर्शविली आहे. सदरचा दर हा दररोज ८ तास काम याप्रमाणे प्रति बंदूकधारी सुरक्षारक्षक दरमहा असा सर्वसमावेशक असून जीप (वाहन), वॉकी-टॉकीचे सेट, सेवाकर, स्थानिक कर इत्यादीसाठी अतिरिक्त रक्कम देण्यात येणार नाही. या दरानुसार तसेच नेमणूकीच्या तारखेपासून पुढील ३ वर्षांसाठी ५ बंदूकधारी सुरक्षारक्षक ठेकेदारांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या जमिनींच्या व मिळकतींच्या संरक्षणाकरीता दरवर्षी सुमारे रु.६.१२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

**१०.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र.१००३ :</u>**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे प्राधिकरणाच्या वेगवेगळया जमिनींचे व मिळकतींचे संरक्षणासाठी

प्रति बंदूकधारी सुरक्षारक्षक प्रति मास रु.४,२००/- या दराने (रोजचे ८ तास व सर्व समावेशक दराने) बंदूकधारी सुरक्षारक्षकांच्या सेवा पुरविण्यासाठी (१) मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.) लिमिटेड, (२) मे.इगल सिक्युरिटी अँड पर्सोनेल सर्व्हिसेस, (३) मे.मॉडर्न व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स (इंडिया) प्रा.लि., (४) मे.सिंग इंटेलिजन्स सिक्युरिटी प्रा.लि., आणि (५) मे.विशाल प्रोटेक्शन फोर्स या पाच ठेकेदारांच्या निविदा स्विकारण्यास मान्यता देत आहे. जीप, वॉकी-टॉकीचे सेट, सेवाकर, स्थानिक कर इत्यादींसाठी वेगळा आकार देण्यात येणार नाही. सुरक्षारक्षक ठेकेदारांचा कालावधी त्यांच्या नेमणूकीच्या तारखेपासून ३ वर्षांसाठी असेल व ठेकेदारांच्या सुरक्षारक्षकांची समप्रमाणात वाटणी कामाच्या गरजेनुसार व ठेकेदारांच्या कार्यतत्परतेनुसार करण्यात येईल.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास तसेच त्या वेळच्या गरजेप्रमाणे बंदूकधारी सुरक्षारक्षकांच्या कंत्राटांचा कालावधी कमी किंवा जास्त करण्यास, आवश्यकतेनुसार बंदूकधारी सुरक्षारक्षकांची संख्या कमी किंवा जास्त करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.११</u> : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ मे, २००६ ते दिनांक ३० जून, २००६</u>**

**११.१** दिनांक १ मे, २००६ ते ३० जून,२००६ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाबाबत महानगर आयुक्त यांनी संक्षिप्त माहिती दिली. यासंबंधात मुख्य लेखा अधिकारी व वित्त सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी असे सांगितले की, दिनांक १७ मे, २००६ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या २१६ व्या बैठकीतील शिफारशीनुसार तसेच दिनांक १८ मे, २००६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ११६व्या बैठकीतील निर्णयानुसार प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधी दिनांक १३ मार्च, २००६ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांनुसार गुंतविण्यात येतो. तथापि, त्यानंतर शासनाच्या वित्त विभागाने असे कळविले आहे की, प्राधिकरणाचे नाव राज्य शासनाच्या उपक्रमांच्या यादीतून वगळण्यात आल्यामुळे अतिरिक्त निधी गुंतविण्याबाबतचा शासन निर्णय प्राधिकरणास लागू होत नाही व प्राधिकरणाचे यासंबंधात पाठविलेले पत्र प्रशासकीय विभाग म्हणून नगर विकास विभागास पुढील

कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. तथापि, यासंबंधात नगर विकास विभागाने अद्याप निर्णय कळविलेला नाही.

**११.२** चर्चेनंतर, अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे निदेश दिले की, प्राधिकरणातील अतिरिक्त निधी दिनांक १३ मार्च, २००६ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्वांनुसार व शासन निर्णयाच्या दिनांकापासून गुंतविण्यात यावा तसेच या संबंधात नगर विकास विभागाने वित्त विभागाबरोबर चर्चा करुन शासनाचे आदेश तातडीने प्राधिकरणाकडे निर्गमित करावेत.

**बाब क्र.१२ : सिकॉमकडील रु.५० कोटी ठेवीचे नुतनीकरण करण्याबाबत.**

**१२.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाची रु.२४६.१७ कोटी इतकी ठेव रक्कम सिकॉमकडे ३१ मार्च, २००३ अखेर प्रलंबित होती. त्यापैकी त्यांनी रु.१९६.१७ कोटी इतकी रक्कम जून, २००६ अखेर हप्त्याहप्त्याने परत केली आहे. उर्वरीत ठेव रक्कम रु.५० कोटीसंबंधात त्यांनी प्राधिकरणाकडे प्रस्ताव पाठविला असून सदर प्रस्तावामध्ये अशी विनंती केली आहे की, रु.५० कोटीची ठेव रक्कम पुढील ५ वर्षांसाठी शक्य नसल्यास किमान ३ वर्षांसाठी ठेवावी व त्यावर तिमाही ७.७५% या दराने व्याज आकारणी करावी तसेच ठेवींच्या वाढीव कालावधीकरीता आकारण्यात आलेल्या २% अतिरिक्त व्याजाबाबत नंतर निर्णय घेण्यात यावा. प्राधिकरणाने यापूर्वी सिकॉमच्या विनंतीचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन ठेव रक्कम ३ वर्षाकरीता सिकॉमकडे ठेवण्यात आली होती व सिकॉमला सदर रक्कम प्राधिकरणास हप्त्याहप्त्याने देण्याबाबतही सवलत दिलेली होती. प्राधिकरणास निधीची आवश्यकता असल्यामुळे रु.५० कोटी ही ठेव रक्कम सिकॉमने १२ महिन्याच्या कालावधीत दरमहा समान हप्त्यात ८.५०% व्याज दराने (तिमाही) परत करावी असा प्रस्ताव आता कार्यकारी समितीच्या आदेशार्थ सादर करण्यात आला आहे.

**१२.२** चर्चेदरम्यान श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, सिकॉमकडील ठेवीचे नूतनीकरण करताना ठेवीवरील व्याज दर ८.५०% पेक्षा कमी करु नये. तसेच ठेवीसंबंधीत सर्व अटी सिकॉमने मान्य केल्यानंतरच ठेवीचे नूतनीकरण एक वर्षाकरीता करण्यात यावे.

**१२.३** त्यानंतर, कार्यकारी समितीने पुढीलप्रमाणे निर्णय घेतले :-

(१) वित्त विभागाने निर्गमित केलेला गुंतवणूकीचा शासन निर्णय दिनांक २२ मार्च, २००६ व मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियमाचे कलम १८(२) अन्वये नगर विकास विभागाच्या मान्यतेनंतर ठेव गुंतविण्यात यावी.

(२) सिकॉमकडील उर्वरीत ठेव रक्कम रु.५० कोटीचे नूतनीकरण फक्त १ वर्षाकरीता करण्यात यावे. ठेवीचे नूतनीकरण दिनांक १९ जून, २००६ पासून म्हणजे ज्या तारखेस ठेव देय झाली त्या तारखेपासून करण्यात यावे.

(३) सदर ठेवीची व्याजासह परतफेड सिकॉमने १२ दरमहा समान हप्त्यांमध्ये करावी.

(४) सदर ठेवीवर ८.५०% (तिमाही) इतका व्याजाचा दर आकारण्यात यावा.

(५) सिकॉमकडील प्राधिकरणाची ठेव सुरक्षित राहण्यासाठी शासन निर्णयानुसार सिकॉमने या ठेवी वित्तीय मत्तेद्वारे (financial assets) सुरक्षित कराव्यात व त्याचे प्रमाणपत्र सिकॉमचे कंपनी सचिव व सनदी लेखापाल यांच्याकडून साक्षांकित करुन दर तिमाहीस सादर करावे.

(६) सिकॉमने ठेवीची व्याजासह परतफेड दरमहा समप्रमाणात न केल्यास २% अतिरिक्त व्याज आकारण्यात यावे.

(७) संपूर्ण रक्कमेची परतफेड केल्याशिवाय सिकॉमला नवीन ठेव देण्यात येऊ नये.

**बाब क्र.१३ : मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प - मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचे (MMRC) कायद्याने संस्थापन करण्यासाठी (Incorporation) मे.राईट्स लि. या संस्थेची सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

**१३.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ३ छन्नमार्गापैकी वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा छन्नमार्ग सार्वजनिक व खाजगी सहभागाने बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर "मुंबई मेट्रो-१ समुह -रिलायन्स एनर्जी यांच्या पुढाकाराने" व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यातर्फे राबविण्यात येणार आहे. कुलाबा-वांद्रे-चारकोप हा दुसरा छन्नमार्ग मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळामार्फत राबविण्यास राज्य शासनाने मे, २००६ मध्ये मान्यता दिली असून या महामंडळाची स्थापना होईपर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची कार्यान्वयन संस्था म्हणून शासनाने नियुक्ती केली आहे. मुंबई मेट्रो रेल प्रकल्पाचा दुसरा आणि इतर छन्नमार्ग राबविण्यासाठी कंपनी कायदा, १९५६ अन्वये प्रथम मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाची कंपनी म्हणून

नोंदणी करावी लागेल. दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाची कायद्याने संस्थापना करण्याची प्रक्रिया मे.राईटस लि. या भारत सरकारच्या उपक्रमामार्फत पूर्ण करण्यात आली. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाची स्थापना तातडीने करण्याच्या दृष्टीने तसेच दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळाच्या संस्थापनेसंबंधीचा अनुभव लक्षात घेऊन मे.राईटस लि. या संस्थेची मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाची कायद्याने संस्थापना करण्यासाठी एकमेव स्त्रोत या तत्वावर रु.४.७५ लाख अधिक कर इतक्या फी वर नियुक्ती करण्यात आली आहे. मे.राईट्स लि. यांनी हे काम त्यांची टीम संघटीत झाल्यापासून ३ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावयाचे आहे. मे.राईटस लि. यांच्या नियुक्तीची बाब आता कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे.

१३.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**<u>ठराव क्र. १००४</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाचे कायद्याने संस्थापन करण्यासाठी सल्लागार म्हणून मे.राईट्स लिमिटेड या संस्थेची एकमेव स्त्रोत या तत्वावर तसेच रु.४.७५ लाख (रु.चार लाख पंच्याहत्तर हजार मात्र) अधिक कर इतक्या फी वर नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देत आहे."

**बाब क्र.१४ : वडाळा येथील भारवाहनतळ व आंतरराज्य बसवाहनतळ यांचे विकास आराखडा तयार करणे तसेच आंतरराज्य बसवाहनतळासाठी सखोल तांत्रिक-आर्थिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करुन, बांधा - वापरा - व हस्तांतरण करा, सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर उभारणी करण्याकरीता सल्लागाराची नेमणूक करण्याबाबत.**

१४.१ या बाब टिप्पणीबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहनतळ आणि आंतरराज्य बसवाहनतळाचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने डिसेंबर,

२००५ मध्ये प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानंतर, कार्यकारी समितीच्या मान्यतेने, वडाळा येथील भारवाहनतळ व आंतरराज्य बसवाहनतळाचा विकास आराखडा तयार करण्यासाठी तसेच बांधा, वापरा व हस्तांतरण करा / सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर आंतरराज्य बसवाहनतळाची उभारणी करण्याच्या दृष्टीने सखोल तांत्रिक - आर्थिक व वित्तिय सुसाध्यता अभ्यास करण्याकरीता सल्लागार नेमण्यासाठी जागतिक स्तरावर निविदेद्वारे तांत्रिक व वित्तीय प्रस्ताव मागविण्यात आले. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, सल्लागाराच्या कामाची विभागणी ३ टप्प्यात केली असून टप्पा-१ अंतर्गत सल्लागारांनी नियोजित भूमिचे संकल्पचित्र तयार करण्याचे व व्यावसायिक नियोजनाचे काम ६ महिन्यांत पूर्ण करावयाचे आहे, टप्पा-२ अंतर्गत आंतरराज्य बसवाहनतळाचा सखोल तांत्रिक - आर्थिक व वित्तिय सुसाध्यता अभ्यास करुन बांधा, वापरा व हस्तांतरण करा / सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर उभारणी करण्याकरीता निविदा तयार करणे तसेच कंत्राटदाराची नेमणूक करण्याच्या बाबतीत प्राधिकरणास मदत करणे ही कामे ११ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावयाची असून टप्पा-३ अंतर्गत प्रकल्प राबविण्यासाठी प्राधिकरणाला मालकाचे सल्लागार / स्वतंत्र अभियंता म्हणून मदत करावयाची आहे. टप्पा-३ चा कालावधी १८ ते २४ महिने राहील. आंतरराज्य बसवाहनतळाची उभारणी करण्याकरीता अंदाजित खर्च जास्तीत जास्त रु.२०० कोटी इतका अपेक्षित आहे. बाब टिप्पणीत नमूद केल्याप्रमाणे, प्राधिकरणाच्या विनंती प्रस्तावात (Request for proposal) नमूद केलेल्या अटींनुसार मूल्यमापन समितीने प्राप्त झालेल्या एकूण ७ सल्लागारांच्या प्रस्तावांचे मूल्यमापन केले असता पात्रतेच्या निकषानुसार ३ सल्लागार पात्र ठरले. त्यापैकी तांत्रिक निकषांवर कमीत कमी ८०% गुण मिळालेल्या २ सल्लागारांचे वित्तीय प्रस्ताव उघडण्यात आले. या वित्तीय प्रस्तावांचे मूल्यमापन केल्यानंतर रु.२,८७,२६,६८०/- इतक्या फी ची लघुत्तम निविदा सादर करणारे निविदाकार मेसर्स स्टुप-आय.डी.ई.सी.के.जे.व्ही. व उपसल्लागार ट्रॅमेल क्रो मेघराज प्रा. लि. यांच्याबरोबर मूल्यमापन समितीने वाटाघाटी केल्या असता सदर लघुत्तम निविदाकाराने त्यांचा वित्तीय देकार कमी करण्यास असमर्थता दर्शविली. आता या लघुत्तम वित्तीय देकार सादर करणाऱ्या पात्र सल्लागाराची नियुक्ती करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

**१४.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र. १००५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वडाळा येथील भारवाहनतळ व आंतरराज्य बसवाहनतळ यांचे विकास आराखडा तयार करणे तसेच बांधा, वापरा व हस्तांतरण करा / सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर आंतरराज्य बसवाहनतळाची उभारणी करण्याच्या दृष्टीने सखोल तांत्रिक-आर्थिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करुन आंतरराज्य बस वाहनतळाची उभारणी करण्याकरीता प्राधिकरणास मदत करण्यासाठी लघुत्तम निविदाकार मेसर्स स्टुप - आय.डी.ई.सी.के. जे.व्ही. व उपसल्लागार ट्रॅमेल क्रो मेघराज प्रा.लि. यांची सर्वकरांसहित रु.२,८७,२६,६८०/- (रुपये दोन कोटी सत्याऐंशी लाख सव्वीस हजार सहाशे ऐंशी मात्र) इतक्या फी वर सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : महाराष्ट्र शासनाच्या मुंबई परिवर्तन प्रकल्पांतर्गत करावयाच्या पथदर्शक अभ्यासासाठी रु.८.९९ लाख खर्च करणे.**

**१५.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्थापन करण्यात आलेल्या मुंबई परिवर्तन आधार कक्षाने झोपडपट्टी पुनर्विकास व उपकर लावलेल्या जुन्या इमारतींचा तसेच जुन्या शासकीय इमारतींचा एकत्रित पुनर्विकास आणि अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांकाशी संबंधित सार्वजनिक परिवहन अभिमुख विकास (Transit Oriented Development) इत्यादी विविध धोरणात्मक पर्याय तयार करण्यासाठी ६ पथदर्शक अभ्यास हाती घेण्याचे ठरविले आहे. या अभ्यासांपैकी चटईक्षेत्र निर्देशांक

विचारात घेऊन सार्वजनिक परिवहन अभिमुख विकासाचा अभ्यास रचना संसद महाविद्यालय करणार असून हा अभ्यास ६ महिन्यात पूर्ण करण्यात येईल व त्यासाठी रु.८.९९ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. या अभ्यासासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रस्तावित मेट्रो रेल्वे स्टेशन अथवा सध्या वापरात असलेले दुसरे सुयोग्य रेल्वे स्टेशन निवडण्यात येईल तसेच या अभ्यासासाठी नेमावयाच्या तांत्रिक सुकाणू समिती आणि संनियंत्रण समितीमध्ये प्राधिकरणाचा सहभाग राहील. या अभ्यासासाठी लागणारी रु.८.९९ लाख इतकी रक्कम प्राधिकरणाने अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला उपलब्ध करुन द्यावी अशी विनंती प्रकल्प व्यवस्थापक, मुंबई परिवर्तन प्रकल्प (Mumbai Transformation Project) यांनी केलेली आहे. त्यानुसार सदर रक्कम अदा करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

१५.२ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

<u>ठराव क्र.१००६</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** कार्यकारी समिती याद्वारे प्रस्तावित सार्वजनिक परिवहन अभिमुख विकासासंबंधीचा (Transit Oriented Development) पथदर्शक अभ्यास रचना संसद महाविद्यालयामार्फत हाती घेण्यास आणि या अभ्यासाच्या खर्चासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नावे रु.८.९९ लाख इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.१६</u> : <u>मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मे.ली इंटरनॅशनल लि. यांच्यामार्फत हाती घेण्यात आलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाची व्याप्ती महानगर प्रदेशाची कार्ययोजना तयार करण्यासाठी वाढविणे - अतिरिक्त खर्च सुमारे रु.२.४० कोटी.</u>**

१६.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना श्री.संजय उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प), महाराष्ट्र शासन यांनी असे सांगितले की, नोव्हेंबर, २००५ मध्ये जागतिक बँकेच्या अधिका-यांसमवेत

झालेल्या बैठकीत ठरविण्यात आले की, मुंबई परिवर्तन प्रकल्पाची (Mumbai Transformation Project) व्याप्ती वाढवून त्यामध्ये संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशाचा समावेश करण्यात यावा तसेच मुंबई महानगर प्रदेशाचा आर्थिक पायाभूत सुविधा आणि गृहनिर्माण क्षेत्रांमध्ये विकास करण्यासाठी कार्ययोजना (Business Plan) तयार करण्यात यावी. तसेच अशी कार्ययोजना तातडीने तयार करावी असे निदेश शासनाने प्राधिकरणास दिले आहेत. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने हाती घेतलेल्या मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत प्राधिकरणाने मे.ली इंटरनॅशनल लि. या सल्लागारांमार्फत मुंबई महानगर प्रदेशासाठी सर्वंकष परिवहन अभ्यास (Comprehensive Transportation Study) हाती घेतला असून या अभ्यासासाठी सल्लागारांनी मोठया प्रमाणावर माहिती गोळा केलेली आहे. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशासाठी कार्ययोजना तयार करण्याच्या कामाला गती मिळावी म्हणून या कार्ययोजनेसाठी मे. ली इंटरनॅशनल लि. यांची एकमेव स्त्रोत या तत्वावर नेमणूक करण्याचे तसेच मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत अभ्यासासाठी उपलब्ध असलेला निधी ही कार्ययोजना तयार करण्यासाठी वापरण्याचे ठरविण्यात आले. ही कार्ययोजना तयार करण्यासाठी जागतिक बँकेबरोबर विचारविनिमय करुन टर्म्स ऑफ रेफरन्स तयार करण्यात आले आहेत. सदर अभ्यास ६ महिन्याच्या कालावधीत पूर्ण करावयाचा असून त्यासाठी सर्व करांसह रु.१,०६,५९,०००/- अधिक कॅनेडियन डॉलर ३,४१,८०३/- असा दोन्ही मिळून एकूण रु.२.४० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. मे. ली इंटरनॅशनल लि. यांच्यामार्फत हाती घेतलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाची व्याप्ती वाढवून मुंबई महानगर प्रदेशासाठी कार्ययोजना तयार करण्यास आणि त्याचबरोबर विविध विकास पर्यायांच्या परिणामांचा अभ्यास करण्यास जागतिक बँकेने मान्यता दिली आहे.

**१६.२** चर्चेदरम्यान श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, कार्ययोजना तयार करण्याच्या टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये वीज व उर्जा या विषयांचाही समावेश करण्यात यावा. यासंबंधात श्री. उबाळे, सचिव (विशेष प्रकल्प) यांनी असे स्पष्ट केले की, खाजगी उद्योजकांकडून वीज व उर्जा उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे, तथापि मुंबई महानगर प्रदेशासाठी वीज व उर्जेची गरज निश्चित करण्यासंबंधीच्या विषयांचा टर्म्स ऑफ रेफरन्समध्ये समावेश करण्यात येईल.

**१६.३** श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता, सचिव

..२५/-

(विशेष प्रकल्प) तसेच प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांनी स्पष्ट केले की, सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या व्याप्तीमध्ये वाढ करुन त्यामध्ये मुंबई महानगर प्रदेशासाठी कार्ययोजनेचा समावेश करणे ही बाब मे.ली इंटरनॅशनल लि. यांच्याबरोबर करण्यात आलेल्या कंत्राटातील अटी व शर्तींशी ऐकमत्य (in accordance with) आहे याची खात्री करण्यात आली आहे तसेच मे.ली इंटरनॅशनल लि. यांना परिवहन व्यतिरिक्त इतर क्षेत्रांतील अभ्यासाचाही अनुभव आहे.

**१६.४** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१००७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे शासनाने निदेश दिल्यानुसार आणि मुंबई परिवर्तन प्रकल्पांतर्गत प्रस्तावित केल्यानुसार मे.ली इंटरनॅशनल लि. यांच्यामार्फत हाती घेण्यात आलेल्या सर्वंकष परिवहन अभ्यासाची व्याप्ती वाढवून मुंबई महानगर प्रदेशासाठी विविध विकास पर्यायांच्या परिणामांच्या अभ्यासासह कार्ययोजना तयार करण्यास तसेच त्यासाठी सर्व करांसह रु.१,०६,५९,०००/- अधिक ३,४१,८०३/- केनेडीयन डॉलर (दोन्ही मिळून एकूण सुमारे रु.२.४० कोटी) इतक्या अतिरिक्त खर्चास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सीएसटी विमानतळ (देशांतर्गत) सांताक्रुज चौकातील प्रस्तावित उड्डाणपूलाच्या लघुत्तम निविदेला मान्यता देणेबाबत.**

**१७.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक १

फेब्रुवारी, २००६ रोजी झालेल्या २१४ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सीएसटी विमानतळ (देशांतर्गत), सांताक्रुज चौकातील उड्डाणपूलाच्या रु.३३.८५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता दिली. हा सुमारे ७०३ मीटर लांबीचा ३ पदरी दुहेरी उड्डाणपूल असेल. या उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी सार्वजनिकरित्या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या. एकूण १४ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित कालावधीमध्ये ४ पूर्ण केलेल्या निविदा प्राप्त झाल्या. या निविदांची छाननी करुन सल्लागारांनी सर्व निविदाकारांना पात्र घोषित केले. त्यापैकी मे.जे.एम.सी.प्रोजेक्टस् (इंडिया) लि. यांची अंदाजित खर्चापेक्षा ११.९४% जास्त दराची निविदा लघुत्तम असून वाटाघाटीनंतर सदर लघुत्तम निविदाकारांनी देकार सुधारीत केल्याप्रमाणे त्यांचा सुधारीत देकार अंदाजित खर्चापेक्षा ७% जास्त दराचा म्हणजे रु.३०,७८,७०,७७७/- (तरतूद रक्कम धरुन) इतका आहे. सदरील लघुत्तम देकार रास्त व निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारा असल्याने कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सदर उड्डाणपूलाचा खर्च असाईड (ASIDE) निधीतून करण्यात येईल.

**१७.२** श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी विचारणा केली असता, श्री.नागे, मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, यांनी असे स्पष्ट केले की, सदर लघुत्तम निविदाकारांनी इंदूर तसेच मुंबईतील लव्हग्रोव्ह जंक्शन येथील अशाच प्रकारच्या उड्डाणपूलांचे बांधकाम पूर्ण केले असून हैद्राबाद येथील काही उड्डाणपूलांची कामे त्यांनी हाती घेतली आहेत.

**१७.३** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र.१००८</u> :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गावरील सीएसटी विमानतळ (देशांतर्गत), सांताक्रुज चौकातील उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी मे.जे.एम.सी.

प्रोजेक्ट्स (इंडिया) लि. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.००% जास्त दराची म्हणजे रु.३०,७८,७०,७७७/- (रुपये तीस कोटी अठ्ठयाहत्तर लाख सत्तर हजार सातशे सत्त्याहत्तर मात्र) (तरतूद रक्कम धरुन) किंमतीची लघुत्तम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणाऱ्या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील नवघर (मुलुंड) येथील चौकातील प्रस्तावित उड्डाणपूलाच्या निविदा रद्द करणेबाबत.**

**१८.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक १ फेब्रुवारी, २००६ रोजी झालेल्या २१४ व्या बैठकीत कार्यकारी समितीने मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील नवघर (मुलुंड) येथील उड्डाणपूलाच्या रु.९.१७ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता दिली. त्यानंतर, वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन या उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी निविदा मागविण्यात आल्या. एकूण ४ कोरे निविदा संच विकले गेले. तथापि, विहित वेळेमध्ये फक्त २ निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदांच्या कागदपत्रांची छाननी करुन प्रकल्प सल्लागारांनी मे.वालेचा इंजिनियरिंग लि. या निविदाकारांना पात्र घोषित केले. मात्र निविदेतील अटींची पूर्तता करीत नसल्यामुळे मे.परेश इन्फ्रास्ट्रक्चर व फाऊंडेशन्स यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. त्यानंतर, प्रकल्प सल्लागारांनी मे.वालेचा इंजिनियरिंग लि. या पात्र निविदाकारांच्या आर्थिक देकाराची छाननी करुन सदर देकार अंदाजित खर्चापेक्षा ३९% जास्त असल्याने तो रद्द करण्याची शिफारस केली. प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त (अभियांत्रिकी) यांनी सदर निविदाकारांसमवेत वाटाघाटी केल्या असता त्यांनी त्यांचा देकार सुधारीत केला. तथापि, हा सुधारीत देकार अंदाजित खर्चापेक्षा ३६.५०% जास्त असल्याने सदर देकार नाकारुन फेरनिविदा मागविण्यात याव्यात असा प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

**१८.२** त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :–

**ठराव क्र.१००९ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोट-कलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गावरील नवघर (मुलुंड) येथील उड्डाणपूलाच्या बांधकामासाठी प्राप्त झालेल्या निविदा नाकारण्यास तसेच या कामासाठी फेरनिविदा मागविण्यास मान्यता देत आहे."

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

—— ०००००००००००० ——